# कार्यालय ग्राम पंचायत दहेगाव

## पंचायत समिती मौदा, जिल्हा परीषद नागपूर,
## साहीत्य खरेदी करीता (प्रथम वेळ)
## ई–निविदा सुचना क्र. ०१,०२,०३ सन २०२६–२०२७

याव्दारे सर्व अधिकृत बांधकाम साहीत्य पुरवठादारास सुचित करण्यात येते कि, ग्राम पंचायत **दहेगाव** ला सन २०२६–२०२७ या आर्थीक वर्षामध्ये बांधकाम साहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याकरिता ई–निविदा मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक पुरवठादारानी साहित्याचे दर सोबतच्या दरपत्रमध्ये दि. २८/०४/२०२६ रोजी सांयकाळी ०५.०० वाजे पर्यत जिल्हा परिषद नागपूर च्या वेबसाईटवर सादर करावा. सर्व साहित्याचे दर टाकणे बंधनकारक राहील. उशिरा आलेल्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

१) सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षात स्व निधी (सामान्य निधी) तसेच १५ वित्त आयोग, जिल्हा वार्षीक योजना, मा. आमदार व मा. खासदार स्थानीक विकास निधी, शासन योजना २५२५, अनूसुचित जाती व नवबौध्द घटकांचा वस्तीचा विकास करण` योजना व इतर विविध शासन योजना अंतर्गत होणा–या बांधकामा करिता बांधकाम साहीत्य आवश्यकते नुसार पुरवठा करणे.

२) सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षात स्व निधी (सामान्य निधी) अंतर्गत दिवाबत्ती साहित्य आवश्यकते नुसार पुरवठा करणे.

३) सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षात स्व निधी (सामान्य निधी) पाणी पुरवठा नळ योंजना अंतर्गत तसेच १५ वित्त आयोग अंतर्गत पाईप लाईन दुरूस्ती व इतर कामाकरिता लागणारे बांधकाम साहीत्य आवश्यकते नुसार पुरवठा करणे.

### अटी व शर्ती

१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई–निविदा द्वारा ऑनलाईन पद्वतीने सगंणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविद नोटीस प्रसिद्वी सूचना शुद्वी पत्रके इत्यादीची माहिती http//mahatender.gov.in या संकेत स्तळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

२. वरील कामाचे निविदा http//mahatender.gov.in या संकेत स्तळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर निविदा प्रपत्रे अटी व शर्ती ई–संकेत स्थळावर दि. २२/०४/२०२६ स. १०.०० वाजेपासून ते दि. २७/०४/२०२६ ला सायकाळी ०५.०० वाजेपर्यत ऑनलाईन पद्वतीने सादर करता येतील. सदर कामाच्या निविदा बाबत खालील बाबी आवश्यक राहतील.

३. **सदर निविदा बाबत खालील प्रमाणे कागद पत्रे व बाबी आवश्यक राहतील.**

- **a)** पुरवठाधारकाचे **GST** प्रमाणपत्र स्कॅन करून **(Upload)** अपलोड करावे लागेल.
- **b)** पुरवठाधारकाचे उद्योग आधार प्रमाणपत्र व गोमास्ता प्रमाणपत्र स्कॅन करून **(Upload)** अपलोड करावे लागेल.
- **c)** पुरवठाधारक नोंदणी प्रमाणपत्र (फोटो सहित) व प्राप्ती कर पॅन कार्ड स्कॅन करून **(Upload)** अपलोड करावे लागेल.
- **d)** सन २०२५–२०२६ व मागील ०२ वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाण पत्र किवा चालान ची सत्यप्रत जोडणे बंधनकारक आहे.
- **e)** तसेच सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षातील **GSTR-3B** जोडण्यात यावे.
- **f)** तसेच **Gst Clearance Certificate** प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
- **g)** उपरोक्त कागदपत्रे **Digital** स्वाक्षरी करून लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावे.
- **h)** उपराक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणतीही वाढिव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

**i)** निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती पुरवठादारास बंधनकारक राहतील.

**j)** निविदे मधील दरपत्रकामध्ये साहित्यचे दर व त्या साहित्या वर लागणारे **GST** कराचे दर हे वेगळे — वेगळे दर्शविण्यात यावे अन्यथा दरपत्रिका ग्राहय मानली जाणार नाही तसेच निविदा मंजूर झाल्या नंतर देयका मध्ये साहित्याचे दर व त्या साहित्या वर लागणारे **GST** चे दर हे वेगळे दर्शविण्यात यावे या शिवाय कोणताही अतिरिक्त कर देण्यात येणार नाही.

**k)** दर पत्रिकेत दर्शविलेले दर चालू बाजार भावाला आधारित असावे तसेच दर चालू बाजार भावाला आधारित नसल्याची खात्री पटल्यास निविदा रद्द् करण्याचा अधिकार ग्रा.प. ला राहील.

**l)** पुरवठा करत असतांना दरपत्रकामध्ये दिलेले नांमाकित कंपनीचे साहित्यच पुरवठा करणे बंधनकारक राहतील त्यात हलगर्जी पना चालणार नाही.

**m)** पुरवठा धारकास शासकीय **GST** करा मध्ये साहित्याचे दरां मधील बदल झाल्यास सर्व अटी व शर्ती सह बंधनकारक राहील.

**n)** शासन निर्णय क. सकीर्ण २०१८/प्र.क्र१४४/२०१८ कोषा प्रशा—५ दि. २८/०९/२०१८ नुसार देयका वर २**%TDS** नियमाप्रमाणे कपात करण्यात येईल.

४) ऑनलाईन पद्वतीने सादर केलेला लिफाफा क. ०१ (तांत्रिक लिफाफा) दि. २८/०४/२०२६ रोजी स १०.०० वाजता http//mahatender.gov.in या संकेत स्तळावर कार्यालयात उघडण्यात येतील तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास हि निविदा समितीने दिलेल्या दिनांकास उघडण्यात येईल.

५) निविदा बाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना शुद्वीपत्रक अथवा इतर माहितीhttp//mahatender.gov.in या संकेत स्तळावर उपलब्ध आहे.

६) सदर कामाच्या ०३ योग्य निविदा प्राप्त झाल्याशिवाय उघडण्यात येणार नाही.

७) पुरवठादारातर्फे कोणत्याही शर्ती व अटी लावून सादर केलेली ई—निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

८) प्रपत्रातील सर्व साहित्याचे दर टाकणे बंधनकारक राहील.

९) निविदा मंजूर झाल्यास रू. ५००/— स्टॅम्प पेपर वर करारनामा (सात दिवसाच्या आत) करून देणे बंधन कारक राहील. ग्रामपंचायत ने दिलेल्या मुद्तीत करारनामा करून न दिल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

१०) ई—निविदा सोबत सत्य प्रती फक्त राजपत्रित अधिकाऱ्याकडुन साक्षंकित केलेल्या असाव्यात.

११) निविदा फार्म किमत १०००/— रूपये डी.डी. सरपंच/सचिव ग्रामपंचात दहेगाव च्या नावाने बनवुन दिनांक २७/०४/२०२६ ला साय. ०५.०० वाजेपर्यत ग्राम पंचायत ला जमा करून नमुना ०७ पावती निविदेत अपलोड करावी न केल्यास निविदा रद्द समजण्यात येईल

(**Tender Prossesing Fee** हि ऑनलाईन पद्वतीने कंत्राटदारास वेगळी भरणा करावी लागेल)

१२) मंजुर निविदेत सादर दरपत्रकांन्वयेच साहित्य पुरवठा करणे अनिवार्य राहील साहित्याचे वाढीव दर स्वीकारले जाणार नाही.

१३) निविदा मध्ये दिलेले दरामध्ये साहित्य पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१४) सदर कामे पूर्ण झाल्यानंतर कामाचे मुल्यांकन करून पंचायत समिती व जिल्हा परिषद नागपूर कार्यालया कडुन देयक मंजुर व रक्कम प्राप्त झाल्यानंतर पुरवठा धारकांना साहित्याचे देयक अदा करण्यात येईल.

१५) बांधकाम साहित्याची रॉयल्टीची रक्कम पुरवठाधारकाने स्वता: भरावी लागेल. रॉयल्टी भरल्याची पावती बिला सोबत सादर करावी रॉयल्टीची पावती ग्रामपंचायत च्या नावाने असावी अन्यथा रॉयल्टीची रक्कम बिला मधून कपात करण्यात येईल.

१६) ग्रामपंचायत ने दिलेल्या मुदतीत साहित्य पुरवठा न केल्यास सदर निविदा धारकाच्या निविदा रद्द करण्यात येईल व या बाबत निविदा धारकाचा कोणताही उजर अथवा आक्षेप ऐकला जाणार नाही.

१७) एकदा मंजूर केलेली निविदा पुरवठा धारकास मागे घेणे अथवा रद्द करता येणार नाही तसे केल्यास ग्रामपंचायत चे काळया यादीत सदर पुरवठाधारकास समाविष्ट करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१८) साहित्य चांगल्या प्रतीचे व प्रमाणबध्द साहित्य पुरवठा करणे आवश्यक राहील.

१९) कोणतेही कारन न दर्शविता एक किवा सर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायत कमीटी कडे राखीव ठेवण्यात आले आहे.

सरपंच /ग्रामपंचायत अधिकारी
ग्राम पंचायत दहेगाव

# कार्यालय ग्राम पंचायत दहेगाव

## पंचायत समिती मौदा, जिल्हा परीषद नागपूर,

## ई–निविदा सुचना क्र. ०१,०२,०३ सन २०२६–२०२७

## साहीत्य खरेदी करीता (प्रथम वेळ)

ग्राम पंचायत **दहेगाव** प.स. **मौदा** जि.प. नागपूर याव्दारे सर्व अधिकृत बांधकाम साहीत्य पुरवठादारास सुचित करण्यात येते कि, सन २०२६–२०२७ मध्ये विविध योजनेचे साहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याकरिता ई–निविदा मागवण्यात येत आहे. करिता जिल्हा परिषद वेबसाईटवर http.mahatendars.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशील | ई निविदा फी | दर पत्रक विक्रीचा दिनांक | दर पत्रक स्विकृत दिनांक |
|---|---|---|---|---|
| 01 | सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षात स्व निधी (सामान्य निधी) तसेच १५ वित्त आयोग, जिल्हा वार्षीक योजना, मा. आमदार व मा. खासदार स्थानीक विकास निधी, शासन योजना २५२५, अनूसुचित जाती व नवबौध्द घटकांचा वस्तीचा विकास करण` योजना व इतर विविध शासन योजना अंतर्गत होणा–या बांधकामा करिता बांधकाम साहीत्य आवश्यकते नुसार पुरवठा करणे. | १०००/. रू. डी.डी. | दि. २२/०४/२०२६ स. १०. ०० वाज | दि. २७/०४/ २०२६ साय. ०५. ०० वाजे |
| 02 | सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षात स्व निधी (सामान्य निधी) अंतर्गत दिवाबत्ती साहित्य आवश्यकते नुसार पुरवठा करणे. | १०००/. रू. डी.डी. | | |
| 03 | सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षात स्व निधी (सामान्य निधी) पाणी पुरवठा नळ योंजना अंतर्गत तसेच १५ वित्त आयोग अंतर्गत पाईप लाईन दुरूस्ती व इतर कामाकरिता लागणारे बांधकाम साहीत्य आवश्यकते नुसार पुरवठा करणे. | १०००/. रू. डी.डी. | | |

निविदेतील अर्टी व शर्ती जिल्हा परिषद नागपूर महाराष्ट्र शासनाच्या http.mahatendars.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.निविदा सादर करण्याची डिजीटल सही अनिवार्य राहील. निविदा शक्यतो व त्याच दिवसी किवा समितीने दिलेल्या दिनांकास उघडण्यात येईल.

**सरपंच /ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्राम पंचायत दहेगाव**

Signature Not Verified

Digitally signed by Dinkar Hiraman Natiye
Date: 2026.05.14 16:45:58 IST
Location: Maharashtra-MH